# शेतकऱ्यांना मालामाल करणारा मधमाशीपालन व्यवसाय



कु. अर्चना सानप श्री. अमोल विरकर
कृषि विभाग
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

व्यवस्थितपणे मधमाशीपालन केले तर एक एकर शेतात ठेवलेल्या मधमाशांच्या पेट्यातून वर्षाकाठी सरासरी १ लाख रुपयांचा मध जमा होऊ शकतो. यापेक्षाही अधिक मध जमा करणारे लोकही आहेत. मधाचा वापर सध्या वाढत चालला आहे. सुधारलेल्या देशांमध्ये मधाचा वापर दरसाल दरडोई अडीच किलो एवढा आहे. भारतात मात्र हे प्रमाण दरसाल दरडोई केवळ ८ ग्रॅम एवढे आहे. त्यामुळे मधमाशीपालन व्यवसायाला चांगलाच वाव आहे. येत्या दहा वर्षात आयुर्वेदाचा प्रचार खूप झाला तर भारतातला आत्ताचा मधाचा वापर कमीत कमी दहापट तरी नक्कीच वाढू शकतो आणि शेतकऱ्यांना मालामाल होण्याची ही संधी आहे.

## मधमाशीपालन व्यवसायाला ५० % अनुदान:

गेल्या काही वर्षांपासून राज्यातील शेतकरी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक शेती करण्यावर भर देत आहेत. शेतीमध्ये विविध प्रयोग करत आहेत. आधी शेतीसह जोडव्यवसाय म्हणून शेतकरी फक्त पशुपालनाचा व्यवसाय करत असायचा आता मात्र पशुव्यवसायासह मत्स्यपालन आणि आता, मधमाशीपालन या शेतीपुरक व्यवसाय करत आहेत. यासाठी खादी ग्रामोद्योग मंडळाने मधमाशाच्या व्यवसायाला गती देण्याचा आणि त्यातून शेतकऱ्यांना स्वावलंबी करण्याचा चांगलाच प्रयत्न केलेला असून, राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमांतर्गत ही योजना लघुउद्योग श्रेणीत असून मधमाशीपालन व्यवसाय करण्यासाठी शासनकडून शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानही दिले जाते.

## मधमाशीपालनाचे फायदे:

मध हे एक अत्यंत शक्तीदायक व पौष्टीक अन्न व औषध आहे. मधमाशा मेण देतात हे सौंदर्य प्रसाधने, औद्योगिक उत्पादनाचा घटक आहे. शिवाय यापासून मेणबत्ती तयार करतात. मधमाशापासून मिळणारे राजान्न (रॉयल जेली, दंश, विष, व्हिनम) पराग (पोलन) रोंगणे (प्रोपॉलीस) पदार्थांना उच्च प्रतीचे औषधमुल्य आहे. परागीभवनाव्दारे शेती, पिके, फळबागायती पिकांच्या उत्पादनात भरीव वाढीस मदत होते. या व्यवसायासाठी सरकारच्या विविध प्रोत्साहन योजना आहेत.

## मधमाश्यांच्या प्रजाती:

भारतामध्ये मधमाश्यांच्या चार प्रजाती आहेत. दगडी माशी अपीस डोरसाटा या माशा उत्तमप्रकारे मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहतीमागे सरासरी मध उत्पादन ५०-८० किलो असते. लहान माशी अपीस फ्लोरिआ या माशा कमी मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहतीमागे अंदाजे २००-९०० ग्रॅम मध मिळतो. भारतीय मधमाशी अपीस सेराना इंडीका या मधमाशांद्वारे होणारं मध उत्पादन दरवर्षी प्रति वसाहत ६-८ किलो असते. युरोपिअन मधमाशी इटालिअन मधमाशी अपीस मेल्लीफेरा यांच दर वसाहती मागे सरासरी मध उत्पादन २५-४० किलो असते.

## मधमाश्यांच्या पेट्यांची काळजी:

मधमाशीपालनासाठी मधमाशीबरोबर पेटीची आवश्यकता असते. एका पेटीची किंमत ही सुमारे ३५०० असते. या पेटीत एकूण दहा फ्रेम असतात. तर एका फ्रेममध्ये २५० ते ३०० माशा राहतात. माशीची निवड केल्यानंतर पेट्या योग्य ठिकाणी ठेवाव्यात. कालांतराने माशा मधपेटीत साठवण्यास सुरुवात करतील. मधाचे पोळे मधाने भरल्यानंतर ते योग्य पद्धतीने चाकूने कापून घ्यावे. त्यानंतर कापून घेतलेला भाग यंत्रात टाकावा. यंत्र सुरू झाल्यावर मध बाजूला होऊन नको असलेला भाग वेगळा होईल. एका फ्रेममधून साधारण २०० ग्रॅम एवढा मध मिळतो.

## मधाचे औषधी गुणधर्म:

मध हे ऊर्जा देणारे एक उत्तम नैसर्गिक अन्नघटक असून, एक चांगले ॲन्टीबायोटिक आणि ॲन्टीसेप्टीक आहे. मध हे स्नायूंना बळकटी देते. खोकला, कफ, दमा या विकारांवर मध उपयुक्त असून, यकृत व पोटाच्या आजारावर उपयुक्त व वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मध हे जलद थकवा घालवून कार्यशक्ती वाढवते. शिवाय विविध प्रकारच्या सौंदर्य प्रसाधनामध्ये ही याचा वापर होत असतो. विशेष म्हणजे काही पिकांनाही मधमाशांचा फायदा होतो. कापूस, मोहरी, तीळ, कराळ, सुर्यफूल, वांगी, भेंडी, मिरची, काकडी, भोपळा, टोमॅटो, दुधीभोपळा, कारले, सफरचंद, लिंबू, संत्री, मोसंबी, पेरू, लिची, तूर, मूग, उडीद या पिकांच्या उत्पादनात चांगलीच वाढ होते.

## मधमाशीपालन करताना घ्यावयाची काळजी:

मधशेती करताना पेट्या या खुल्या जागेत ठेवाव्यात. मधमाश्यांना त्रास दिल्यास त्या चावतात त्यामुळे त्यांनी चावा घेतल्यास योग्य उपचार घेणे गरजेचे आहे. पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत मध उत्पादन केंद्र उभारावे. फळबागांच्या जवळ मकरंद, परागकण आणि भरपूर पाणी असलेल्या ठिकाणी उभारणी करावी. पोळ्याचे तापमान आवश्यक तितके राहण्यासाठी सूर्यप्रकाशापासून मधमाशांचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. मधमाशा पेटीत ठेवतांना चारही पायाखाली पाण्याने भरलेली वाटी ॲन्टवेल्स ठेवावी, जेणेकरून पेटीत मुंग्या जाणार नाहीत. वसाहतींना पाळीव जनावर, अन्य प्राणी, गर्दीचे रस्ते, इलेक्ट्रीक पोलपासून दूर ठेवावे.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★